**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु.पो.निरा, ता. पुरंदर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सचीव, समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
निरा, ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु.पो.निरा, ता. पुरंदर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
निरा, ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१०.२००५/३.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.३.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

(१) निरा येथील समता ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने कर्जदाराकडून 'इमारत निधी' गोळा केला आहे त्याचा हिशोब अद्याप कोठेही, कधीही प्रसिध्द केला नाही. संचयित केलेल्या निधीच्या संज्ञेत इमारत शब्दाचा अंतर्भाव असल्याने, इमारतीसंबंधी अनुषंगीत अशी इत्थंभूत साद्यंत माहिती तपशीलवार म्हणजे जागेचा ७/१२, एकूण क्षेत्रफळ, बांधकाम निधी, बखळ जागा किती संस्थेच्या वापराखेरीज इमारतीपासून अन्य उत्पन्न किती, सर्व नियोजनास निधी पुरला का कमी पडला, त्याची तरतूद कशी केली अथ्वा नियोजित इमारत होऊनही निधी काही शिल्लक आहे का, तो किती, हा निधी आणखी किती वर्षे होणार, संचालक मंडळाची तरतूद काय?

## विवेचन

मौजे निरा, जिल्हा पुणे येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या सेवकवर्गाची गोवा सहल व संचालक मंडळाची काश्मीर सह, तसेच इमारत निधी व इमारती संबंधीचा तपशील याची माहिती अपीलकर्ता श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के यांना जन माहिती अधिकारी तथा सचीव, समता नागरी सहकारी पतसंस्था यांच्याकडे मागितली होती. परंतु 'आपण संस्थेचे सभासद नसल्यामुळे माहिती देता येणार नाही,' असे सचिवांनी श्री.शिर्के यांना कळविले. त्याविरुध्द श्री.शिर्के यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अपील केले. त्यांनी हे

अपील फेटाळल्यामुळे श्री.शिर्के यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. मुख्य राज्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांचेपुढे त्याची सुनावणी झाली. नागरी सहकारी बँक प्रमाणेच पतसंस्था यासुध्दा 'सार्वजनिक प्राधिकरण' यात संस्था मोडत नाही, म्हणून डॉ.जोशी यांनी श्री.शिर्के यांचे अपील अमान्य करणारा निर्णय पूर्वीच (दि.२५.४.२००७)दिला आहे.

## आदेश

मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी यापूर्वी दिलेला आदेश लक्षात घेता अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. ८.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गिरीश रघुनाथ मेहेंदळे
रा.गजराज सोसायटी, फ्लॅट नं.११,
पहिला मजला, राजेंद्रनगर, नवी पेठ,
पुणे ४११०३० अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,
जलभवन, तासगांव, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,
जलभवन, तासगांव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१० / पुणे<br>तक्रार क्र.९६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गिरीश रघुनाथ मेहेंदळे
रा.गजराज सोसायटी, फ्लॅट नं.११,
पहिला मजला, राजेंद्रनगर, नवी पेठ,
पुणे ४११०३०

| | | |
|---|---|---|
| **अपिलीय प्राधिकारी** तथा अधिक्षक अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,<br>जलभवन, तासगांव, जि.सांगली<br>श्री.डी.व्ही.ठकार<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,<br>जलभवन, तासगांव, जि.सांगली<br>श्री.बी.डी.यमगर | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१२.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>(१)बनेवाडी योजनेसंदर्भात ठेकेदाराला भाववाढी देयक अदा करणेसाठी शिफारस केलेल्या पत्राची सहपत्रासह प्रत. तसेच रु.८०,०००/- देयक ठेकेदारास अदा झाले किंवा नाही, नसल्यास कारणांची माहिती.<br>(२)तत्कालीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कवठेमहांकाळ बांधकाम उपविभागाकडून पत्र क्र.भांडार/१२२, दि.१४.५.२००३ अन्वये शाखा अभियंता यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस केलेली होती. विभागीय कार्यालयाने शिस्तभंगाची कारवाई केली का, असल्यास त्यासंबंधातील कागदपत्रे, नसल्यास त्याची कारणे. | |

## विवेचन

बनेवाडी, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली येथील नळपाणी पुरवठा योजनेच्या संदर्भातील भाववाढीचे देयक व तत्कालीन कवठेमहांकाळ उपविभागातील शाखा अभियंता यांनी साहित्याचा कार्यभार स्वीकारण्याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.गिरीश रघुनाथ मेहेंदळे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, सांगली

यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती पाठविली, परंतु देयकाच्या संदर्भातील पत्रामध्ये फेरफार असल्याचे नमूद करुन व त्यावेळी देयकासोबत जोडलेल्या भाववाढीचे तक्ते हेतुत: दिलेले नाहीत व अन्य माहिती मिळालेली नाही, अशा कारणांवरुन श्री.मेहेंदळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे अपील केले. दोन महिने होऊनही त्यांनी अपिलाची दखल न घेतल्याच्या कारणावरुन श्री.मेहेंदळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

याच अनुषंगाने श्री.मेहेंदळे यांनी पूर्वीच्या अर्जासंदर्भात (तासगाव उपविभागाकडून साहित्याचा कार्यभार स्वीकारण्याबाबत) विसंगत माहिती पाठविल्याची तक्रार आयोगाकडे केली आहे. अपील व तक्रार यांचा विषय एकच असून मुद्देही एकाच स्वरुपाचे आहेत.

श्री.मेहेंदळे हे महाराष्ट्र जीवन विकास प्राधिकरणाच्या तत्कालीन तासगाव विभागाखाली कवठेमहांकाळ विभागात उपअभियंता होते. त्या काळातील मतभेदांचा संदर्भ त्यांच्या अर्ज व तक्रारींना असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

श्री.मेहेंदळे यांना मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आलेली आहे. बिलातील फेरफाराचा त्यांचा आरोप चुकीचा आहे, बिल दुरुस्ती केल्यामुळे झालेल्या खाडाखोडीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत, असे उपस्थित जन माहिती अधिकारी श्री.बी.डी.यमगर व अपिलीय प्राधिकारी श्री.डी.व्ही.ठकार यांनी सांगितले. तसेच श्री.मेहेंदळे यांना हवी असलेली कोणतीही माहिती देण्यास आपण तयार असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री.मेहेंदळे यांच्या मूळ अर्जात देयकाची रक्कम अंदाजे रु.८०,०००/- असल्याचे म्हटले आहे परंतु आपण नजरचुकीने रु.८०,०००/- नमूद केले होते, ती रक्कम अंदाजे रु.६०,०००/- होती असे त्यांनी प्रथम अपिलात म्हटले आहे. अपीलकर्ता स्वत: अशा प्रकारची गंभीर चूक नजरचूक म्हणून नमूद कशी करु शकतो, असा प्रश्न श्री.बी.डी.यमगर व श्री.डी.व्ही.ठकार यांनी उपस्थित केला, तो रास्त आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.मेहेंदळे यांना माहिती विहित मुदतीत दिली होती. त्यांनी माहिती मागितलेल्या तीनपैकी दोन मुद्दे कारणे विचारणारे आहेत. शिस्तभंगाच्या कार्यवाहीबाबत कारणे विचारणे 'माहिती ' या सदरात समाविष्ट होत नाही. अपिलातील अपुऱ्या व चुकीच्या माहितीच्या आरोपांबाबत जन माहिती अधिकाऱ्यांकडून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अहवाल मागविला. दरम्यानच्या काळात रु.७५/- शुल्क भरण्यास श्री.मेहेंदळे यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले होते. अन्य एका अर्जाच्या संदर्भात श्री.मेहेंदळे यांना ८५/-रु. शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले होते. आपल्याला आधीच्या पत्रात रु.७५/- शुल्क कळविलेले नसल्यामुळे भरणा केलेला नाही. तसेच अन्यअर्जाबाबत 'सदर कागदपत्रांची सध्या जरुरी नसल्याने' रक्कम रु.८५/-भरणा केला नाही, असे श्री.मेहेंदळे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना कळविले. मात्र शक्य तेवढा तपशील जन माहिती अधिकाऱ्यांनी दिला, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी उर्वरित माहिती देण्याचा आदेश दिला. 'आपणांस माहितीची जरुरी नव्हती तर ते आपण यापूर्वीच वेळेत कळविणे आवश्यक होते. त्यामुळे दिलेल्या माहितीचा खर्च विनाविलंब या खात्याकडे भरणा करावा अन्यथा आपले विरुध्द पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी,' असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी श्री.मेहेंदळे यांना दि.२.२.२००६ रोजी कळविले. आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलात श्री.मेहेंदळे यांनी त्याला आक्षेप घेतला आहे. अशा प्रकारच्या कार्यवाहीचा इशारा देणे योग्य नाही हे त्यांचे म्हणणे रास्त आहे. मात्र शुल्क भरण्यास कळविल्यानंतर माहितीची सध्या जरुरी नसल्याची भूमिका घेणे जबाबदारपणाचे नाही.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतरच्या महिन्याभरातील हा विषय असल्यामुळे शुल्क आदी संदर्भात पूर्ण माहिती नव्हती त्यामुळे काही चुका झाल्या, असे श्री.बी.डी.यमगर यांनी सांगितले. त्यांचे हे प्रतिपादन स्वीकारण्यात येत आहे. अपिलीय

प्राधिकाऱ्यांनी अपिलाची सुनावणी विहित मुदतीत केलेली नाही मात्र अपिलाच्या अनुषंगाने त्यांनी कार्यवाही केली होती त्याची माहिती त्यांनी अपीलकर्त्यास देणे आवश्यक होते.

तासगाव उपविभागाकडून आपण साहित्याचा कार्यभार स्वीकारण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती विसंगत असल्याची तक्रार श्री.मेहेंदळे यांनी केली आहे. परंतु दि.७.७.२००६ रोजी मुख्य राज्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांच्यापुढे झालेल्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी 'जी काही माहिती कार्यालयात उपलब्ध असेल ती पाच दिवसांच्या आत अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी ' असे आदेश मुख्य राज्य माहिती आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार माहिती देण्यात आली असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी कागदपत्रांसह स्पष्ट केले आहे. या कागदपत्रातील निष्कर्ष चुकीचे असल्याचा श्री.मेहेंदळे यांचा आक्षेप आहे. परंतु निष्कर्षाचे मूल्यमापन केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व संबंधित कागदपत्रे विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

**पुणे**
**दि. १७.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रशांत रामचंद्र खोल्लम
द्वारा दत्तात्रय लक्ष्मण बेल्हेकर
धुमाळ बिल्डिंग, सुपेकर गिरणीजवळ
गवळीनगर, भोसरी, पुणे - ३९

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र.२८ निगडी, पुणे ४११०४४

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र. २४, निगडी, पुणे ४११०४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१६ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६. २००७ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** प्रशांत रामचंद्र खोल्लम, द्वारा दत्तात्रय लक्ष्मण बेल्हेकर
धुमाळ बिल्डिंग, सुपेकर गिरणीजवळ, गवळीनगर, भोसरी, पुणे - ३९

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र. २८. निगडी पुणे ४११०४४ श्री. सुगंध. प. उमाप

**जन माहिती अधिकारी** तथा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र. २४ निगडी, पुणे ४११०४४ श्री. अनिल. शं. काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

मौजे भोसरी येथील सर्व्हे क्रमांक २०/१ क, व सर्व्हे क्रमांक २०/३ हे क्षेत्र ता. ३०.४.१९७० मध्ये तहसीलदार, हवेली यांनी पिंपरी चिंचवड शहर विभागातील औद्योगिक निवास व व्यापार विभागाकरिता संपादित केलेले आहे. सदरची जमीन प्राधिकरण विभागामध्ये असून त्यापैकी किती जमीन प्राधिकरण विभागाने संपादित केलेली आहे. जमीन संपादनाच्या बदल्यात या जमिनीच्या मालकांना प्राधिकरणाकडून कोणत्या स्वरुपाची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. त्यामध्ये रोख रक्कम वा प्राधिकरण क्षेत्रामध्ये जमीन देण्यात आलेली असल्यास त्या बाबतची सर्व माहिती मिळावी.

## विवेचन

मौजे भोसरी येथील सर्व्हे क्र. २०/१ क, व सर्व्हे क्र.२०/३ हे क्षेत्र ता. ३०.४.१९७० रोजी तहसीलदार, हवेली यांनी पिंपरी चिंचवड शहर विभागातील औद्योगिक निवास व व्यापार विभागाकरिता संपादित केलेली आहे. त्यापैकी किती जमीन प्राधिकरण विभागाने संपादित केलेली आहे, या जमिनीच्या मालकांना प्राधिकरणाकडून कोणत्या स्वरुपाची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे, त्यामध्ये रोख रक्कम वा प्राधिकरण क्षेत्रामध्ये जमीन देण्यात आलेली असल्यास त्याबाबतची सर्व माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रशांत रामचंद्र खोल्लम यांनी जन माहिती अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे-४४ यांच्याकडे मागितली होती. ही माहिती त्यांना विहित मुदतीत दिली गेली नाही, म्हणून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांच्याकडे अपील केले. या अपिलाची दखल घेतली गेली नाही, म्हणून श्री. खोल्लम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १७ मार्च २००६ पर्यंत माहिती देणे आवश्यक होते, परंतु ती माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ११ दिवस उशिराने पाठविली. विभाग क्र.१ व विभाग क्र.२ यांच्याकडून सुमारे पंचवीस वर्षांपूर्वीची ही माहिती काढून द्यावयाची होती. त्यांच्याकडून ती दि. २०.२.२००६ च्या पत्राने मागितली व त्यांच्याकडून आल्यानंतर दि. २९.३.२००६ रोजी श्री. खोल्लम

यांना दिली, असे जन माहिती अधिकारी श्री. अनिल शं. काळे यांनी नमूद केले. म्हणजे माहिती देण्यास ११ दिवस विलंब झाला आहे, तसेच पूर्ण माहिती दिली गेलेली नाही, अशी अपीलकर्त्याची तक्रार आहे. भरपाई म्हणून १२.५ टक्के जमीन परतावा का दिला नाही, हा श्री. खोल्लम यांचा मुख्य प्रश्न आहे. उपरोक्त जमीन संपादन १९८४ पूर्वीचे असल्यामुळे १२.५ टक्के जमीन परतावा लागू होत नाही. १९८४ नंतरच्या संपादनांना तो लागू होतो, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या उत्तरात नमूद केले आहे. परंतु संपादित जमिनीच्या मालकांना कोणत्या स्वरुपाची नुकसान भरपाई देण्यात आली, त्यात रोख रक्कम वा जमीन असल्यास त्याचा तपशील अपीलकर्त्याने मूळ अर्जात मागितला आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी या तपशिलाची गांभीर्याने नोंद घेतलेली नाही. माहिती पंचवीस वर्षांपूर्वीची असली, तरी अत्यंत मर्यादित स्वरूपाची व नेमकी आहे. त्यामुळे विहित मुदतीतच ती द्यायला हवी होती.

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती सुनावणीपासून चार दिवसात द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. दि. १८.८.२००७ रोजी ही माहिती अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला कळविले आहे. म्हणजेच येथेही विलंबानेच माहिती दिली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित माहिती पुरविण्याबाबत ज्या विभागाच्या अधिकाऱ्यांना लिहिले ते जन माहिती अधिकारी ठरतात व म्हणून अपुरी माहिती देण्यास ते जबाबदार ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य.

२. आयोगाने ठरवून दिलेल्या मुदतीत माहिती न देणे व अपुरी माहिती देणे याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना रुपये १०,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. अशा अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याकडून समप्रमाणात ही शास्ती वसूल करुन दि.२०.१२.२००७ पर्यंत अहवाल आयोगाला पाठवावा. ही जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र.२८ निगडी, पुणे ४११०४४ यांची राहील.

३.    माहिती देण्यास झालेल्या ११ दिवसाच्या विलंबाबद्दल केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ मधील कलम २० अन्वये जन माहिती अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र. २४, निगडी पुणे ४११०४४ यांना रुपये २५०/- प्रतिदिनी या प्रमाणे रूपये २७५०/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती वसूल करुन ती दि. १०.१२.२००७ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र.२८, निगडी, पुणे यांनी करून त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल दि. २०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

४.    वरील कारवाईची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात करून अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांनी पूर्तता अहवाल आयोगाला दि. ३०.१२.२००७ पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २१.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण कोंडीराम भिलारकर (कांबळे)
रा.५१९/२९५४, अक्षय सोसायटी, संत तुकारामनगर,
पिंपरी, पुणे-४११ ०१८ अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
महाबळेश्वर, जि. सातारा उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा निंवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, महाबळेश्वर, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण कोंडीराम भिलारकर (कांबळे)
रा.५१९/२९५४, अक्षय सोसायटी, संत तुकारामनगर,
पिंपरी, पुणे-४११ ०१८

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
महाबळेश्वर, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, महाबळेश्वर, जि.सातारा
प्रभारी श्री.अ. प. जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>(१) कुळ कायदा केस क्र.१९, भिलार १.७.१९६३ वेळेचा आदेश व जाब जबाब नकला.<br>(२) श्री.कोंडिबा कांबळे हे दि.१.४.१९५७ ला कायदेशीर कुळ असलेल्या पेठ्याचा हुकूमनामा टी.एन.सी.३१८, दि.१३.६.१९५७ च्या हुकमाची सत्यप्रत.<br>(३) फेरफार क्र.१५६९ बाबत मूळ अर्जाची झेरॉक्स व जाब जबाब नकला. | |

## विवेचन

भिलार, ता.महाबळेश्वर, जि.सातारा येथील श्री.कोंडिबा कांबळे यांच्या शेतजमिनीबाबतची कुळ कायदा केस क्र.१९ च्या संदर्भातील जाबजबाब आदी माहिती अपीलकर्ता श्री.नारायण कोंडिबा भिलारकर यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. आवश्यक कागदपत्रे न मिळाल्यामुळे श्री.भिलारकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, महाबळेश्वर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा यांच्याकडे अपील केले. त्यानंतरही माहिती न मिळाल्यामुळे श्री.भिलारकर यांनी राज्य माहि आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.भिलारकर यांनी मागितलेली माहिती सन १९५७ ते १९६३ या कालावधीतील आहे. कुळ कायदा केस क्र.१९, भिलार मध्ये दि.१.७.१९६३ रोजी झालेल्या आदेशाच्या व जाबजबाबाच्या नकला, श्री.कोंडिबा कांबळे हे दि.१.४.१९५७ ला कायदेशीर कूळ असलेल्या पेठ्याच्या हुकूमनाम्याची सत्यप्रत व फेरफाराच्या मूळ अर्जाची व जाबजबाबाची प्रत अशी माहिती श्री.भिलारकर यांनी मागितली होती. परंतु 'महाबळेश्वर तहसील कार्यालयाच्या अभिलेख कक्षात ही कागदपत्रे उपलब्ध नाहीत, ही कागदपत्रे या विषयासंबंधातील प्रकरणात उपविभागीय अधिकारी, वाई

यांच्याकडे सादर केल्याचे अभिलेख कक्षातील फेरीस्तवरुन दिसून येते. त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता ही कागदपत्रे या विषयाशी संबंधित प्रकरणासाठी विभागीय आयुक्त , पुणे विभाग, पुणे यांच्याकडे पाठविल्याचे समजते ', असे जन माहिती अधिकारी यांनी श्री.भिलारकर यांना कळविले. विभागीय आयुक्त कार्यालयात संपर्क साधून आवश्यक प्रती मिळवाव्यात, असे त्यांनी या उत्तरात म्हटले आहे.

सन २००१ पासून श्री.भिलारकर वरील कागदपत्रे मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. कुळ कायदा कलम ३२-ग चे प्रमाणपत्रावर श्री.कोंडिबा शिवराम कांबळे यांचे नाव आहे, तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय या जमिनीची विक्री, दान इ. कोणताही बदल करता येणार नाही, असा उल्लेख आहे. असे असताना ७/१२ उताऱ्यावर अन्य व्यक्तींची नावे लागली आहेत, ती कशी लागली, याची तपासणी होण्यासाठी व आपला हक्क शाबित करण्यासाठी आपल्याला ही कागदपत्रे आवश्यक आहेत, असे श्री.भिलारकर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. त्याच वेळी ही कागदपत्रे गायब केली गेली असावीत, असे त्यांनी अपिलात नमूद केले आहे. सन १९६३ साली ज्या लोकांनी कुळ कायद्याने जमिनी खरेदी केल्या त्यांची कागदपत्रे दप्तरी आहेत. परंतु फक्त आपलीच कागदपत्रे मिळत नाहीत, असाही उल्लेख त्यांनी केला आहे. उपविभागीय अधिकारी, वाई यांनी ही कागदपत्रे आपल्याकडे सादर करण्यात आली नसल्याचे उत्तर श्री.भिलारकर यांना दिले आहे. तसेच जिल्हाधिकारी, सातारा व उपविभागीय अधिकारी, वाई यांनी या जमीन प्रकरणी अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे सादर केलेल्या कागदपत्रात श्री.भिलारकर यांनी मागितलेली कागदपत्रे आढळून येत नाहीत, असे पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातील अभिलेखपालांनी श्री.भिलारकर यांना कळविले आहे.

श्री.भिलारकर यांनी मागितलेली कागदपत्रे सन १९५७ ते १९६३ इतक्या जुन्या कालावधीतील आहेत. श्री.भिलारकर यांच्यासह अभिलेखपालांनी शोध घेतला, परंतु ही कागदपत्रे आढळली नाहीत, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, महाबळेश्वर यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. अशा प्रकारे आपल्या समक्ष शोध घेतल्याचे श्री.भिलारकर यांनी मान्य केले, मात्र दाखविलेली कागदपत्रे पाहिली, संपूर्ण शोध घेतला, असे आपण म्हणू शकणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच केवळ आपलीच कागदपत्रे उपलब्ध कशी नाहीत, अशी शंका

श्री.भिलारकर यांनी सातत्याने लेखी व तोंडी व्यक्त केली आहे. या कागदपत्रांचा पुन्हा एकदा शोध घेण्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर यांनी स्वतः व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, महाबळेश्वर यांच्या वतीनेही मान्य केले. आयोगाने त्यासाठी त्यांना तीस दिवसांची मुदत दिली. उपविभागीय अधिकारी, वाई यांचेकडील अभिलेखामध्येही याच मुदतीत शोध घेऊन श्री.भिलारकर यांना आवश्यक असलेली माहिती द्यावी, असे आदेश आयोगाने दिले, व ते संबंधितांना कळविण्याच्या सूचना जन माहिती अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच तहसीलदार कार्यालय, महाबळेश्वर येथे श्री.भिलारकर यांना संबंधित सर्व अभिलेखाची पाहणी करु द्यावी, असाही आदेश आयोगाने दिला. त्यानुसार दि.८.७.२००७ व ११.७.२००७ रोजी तहसीलदार कार्यालय, महाबळेश्वर येथे आपण हजर राहिलो, कागदपत्रांचा शोध घेण्याचे काम सुरु आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, महाबळेश्वर श्री.राजाभाऊ माने यांनी सांगितल्याचे श्री.भिलारकर यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

श्री.भिलारकर यांनी मागितलेली माहिती सुमारे चाळीस वर्षांपूर्वीची आहे. परंतु संबंधित विषयाबाबत वाद असल्यामुळे अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे सदर विषय प्रलंबित आहे. ही कागदपत्रे सन २०२० पर्यंत जतन करुन ठेवावीत, अशी या विषयाशी संबंधित नस्तीबाबतची नोंद आहे. असे असताना ती उपलब्ध का होऊ शकत नाहीत? तसेच जर ही कागदपत्रे उपलब्ध नसतील तर उपविभागीय अधिकारी, वाई व जिल्हाधिकारी, सातारा यांनी चार वर्षांपूर्वी या विषयाबाबत आपल्याविरुध्द निकाल कशाच्या आधारे दिला?, असे प्रश्न श्री.भिलारकर यांनी उपस्थित केले. या पार्श्वभूमीवर संबंधित कागदपत्रे न मिळाल्यास आपल्याला न्याय मिळण्यात अडचणी येतील, असे श्री.भिलारकर यांचे म्हणणे आहे. गेली अनेक वर्षे हीच परिस्थिती असल्यामुळे संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसण्यास काय कारण आहे व कोण जबाबदार आहे, हे आपण सांगू शकणार नाही, असे उपस्थित अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

श्री.भिलारकर यांनी मागितलेल्या कागदपत्रांचा शोध जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी घेतला आहे, परंतु कुळ कायद्यांतर्गत जमीन खरेदीच्या तत्कालीन अन्य प्रकरणांमधील कागदपत्रे उपलब्ध असताना केवळ श्री.भिलारकर यांच्याच विषयाची कागदपत्रे मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती असल्यास ते निश्चितपणे संशयाला वाव देणारे आहे. या संदर्भात

त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न महत्त्वाचे असले तरी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील तो विषय नाही.

वरील निवेदनांचा व संदर्भांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

(१) अपील मान्य.

(२) श्री.भिलारकर यांनी मागितलेल्या कागदपत्रांचा विभागीय आयुक्त पातळीवरुन शोध घ्यावा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल दि.३०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १३.११.२००७**

प्रत::विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना आदेशातील कार्यवाहीसाठी पाठविणेत येत आहे.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड . जे.एम.पाटील — अपीलकर्ता
रा.१५/७, सिध्दिविनायक हाईटस् , विश्वेश्वर बँकेसमोर,
पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे ४११ ०४३

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१,
पुष्पा हाईटस, पुष्पमंगल कार्यालयाजवळ,
बिबवेवाडी, पुणे ४११ ००२ — उत्तरवादी
श्री.शरद जाधव

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक दुय्यम निबंधक हवेली नं.१,
पुणे तहसील कार्यालय आवार, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड . जे.एम.पाटील, रा.१५/७, सिध्दिविनायक हाईटस् , विश्वेश्वर बँकेसमोर, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे ४११ ०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१, पुष्पा हाईटस, पुष्पमंगल कार्यालयाजवळ, बिबवेवाडी, पुणे ४११ ००२, श्री.शरद जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

(१)मौजे नऱ्हे, ता.हवेली, जि.पुणे येथील खरेदी दस्त क्र.११४१३/९१, दि.२१.८.१९९१ ची मूळ प्रत मागणीसाठी अर्ज दि.२४.६.२००६ रोजी देऊनही गेल्या एक वर्षात हा दस्त का मिळू शकत नाही याचे खरे कारण समजून येत नाही. त्यासाठी आपले कार्यालयात रु.२००/- रक्कम भरुन मूळ दस्त देण्याचे कबूल करुनही मुद्दाम तो देण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे.

## विवेचन

मौजे नऱ्हे, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.२४/१+२+३+४+५+६+७यांसी क्षेत्र २ हेक्टर ५९ आर या मिळकतीचे खरेदीखत नोंदणीदस्त नं.११४१३/९१, दि.२२.०८.१९९१ ची मूळ प्रत अपीलकर्ता ॲड .जे.एम.पाटील यांनी दि.२४.०६.२००४ रोजी अर्ज देऊन जन माहिती अधिकारी तथा सहायक दुय्यम निबंधक हवेली नं.१ यांचेकडे मागितली होती, त्यासाठी लागणारी फी रु.२००/- भरलेली होती. प्रत न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१ यांचेकडे अपील केले, परंतु त्याची दखल घेतली गेली नाही, अशा कारणावरुन ॲड.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नावे दर्शविणारे फलक जिल्हा निबंधक अथवा त्यांच्या अखत्यारीतील अन्य कार्यालयात लावण्यात आलेले नाहीत, असेही ॲड.पाटील यांनी या अपिलात म्हटले आहे.

ॲड.पाटील हे निवृत्त तहसीलदार असून तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती पी.सी.पुड्ठा यांनी आपल्या अर्जाची मुदतीत दखल घेतली नाही व आपल्याला शुल्क भरल्यानंतरही मूळ दस्तासाठी वेगवेगळ्या कर्मचाऱ्यांकडे पाठविले गेले, अशी ॲड. पाटील यांची तक्रार आहे. मात्र

राहिलेली नाही, असे ॲड.पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. तसेच जिल्हा निबंधकांच्या व त्यांच्या अखत्यारीतील २१ कार्यालयांमध्ये केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार आवश्यक ते फलक लावण्यात आलेले असल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१ श्री.शरद जाधव यांनी आपल्या निदर्शनास आणले आहे, असेही ॲड. पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक दुय्यम निबंधक हवेली नं.१ श्रीमती सी.पी.पुठ्ठा यांना माहिती मागणाऱ्या अर्जाबाबत विहित मुदतीत दखल घेण्याची समज देण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ८.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.माधव बळवंत करमरकर
रा.बी-६./ पंचरत्न को-ऑप.हौसिंग सोसायटी,
१३, शिलाविहार, पुणे-३८ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकार आयुक्त निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक (नागरी बँका) सहकार आयुक्त
निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.७.२००७ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माधव बळवंत करमरकर
रा.बी-६ / पंचरत्न को-ऑप.हौसिंग सोसायटी,
१३, शिलाविहार, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकार आयुक्त निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक (नागरी बँका) सहकार आयुक्त
निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.७.२००६ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

'रुपी को. ऑप. बँक लि., पुणे' या बँकेतील गैरव्यवहाराबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सहकारी संस्था निबंधक, महाराष्ट्र राज्य यांना दि.७.२.२००२ रोजी पाठविलेल्या क्र.यूबीडी.बीएसडी (१)(एससीबी)/३१८४/१२.०३.९४१/२००१-०२.

## विवेचन

'रुपी को. ऑप. बँक लि., पुणे' या बँकेतील गैरव्यवहाराबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सहकारी संस्था निबंधक, महराष्ट्र राज्य यांना दि.७.२.२००२ रोजी पाठविलेल्या 'क्र.यूबीडी.बीएसडी (१)(एससीबी)/३१८४/१२.०३.९४१/२००१-०२' या पत्राची प्रत अपीलकर्ता श्री.माधव बळवंत करमरकर यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक (नागरी बँका), सहकार आयुक्त निबंधक सहकारी संस्था, पुणे यांच्याकडे मागितली होती. 'रिझर्व बँकेकडून या कार्यालयास प्राप्त झालेले सदरचे पत्र गोपनीय असल्याने ते आपण रिझर्व बँकेकडून उपलब्ध करुन घ्यावे,' असे जनमाहिती अधिकाऱ्यानी श्री.करमरकर यांना कळविले. त्याविरुध्द श्री.करमरकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अपर आयुक्त विशेष निबंधक, सहकार आयुक्त निबंधक सहकारी

संस्था, महाराष्ट्र राज्य यांचेकडे अपील केले. त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय ग्राह्य ठरवून अपील अर्जावर कोणतीही कारवाई करता येत नसल्याचे श्री.करमरकर यांना कळविले. त्याविरुध्द श्री.करमरकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सहकारी बँकांमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार घडत असल्याची प्रकरणे सातत्याने उजेडात येत आहेत. या पार्श्वभूमीवर बँकांमधील कारभाराबाबत जाणून घेणे हा लोकांचा हक्क आहे. त्याबाबत केली जाणारी कारवाई कारणांसह माहीत होणे सार्वजनिक हिताचे व आवश्यक आहे. बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याची कारवाई रिझर्व्ह बँकेच्या ज्या पत्राच्या आधारे केली ते लोकांपुढे आले पाहिजे, असे प्रतिपादन श्री.करमरकर यांनी आयोगापुढील सुनावणीत विस्ताराने केले.

रुपी को-ऑपरेटिव्ह बँकेत रुपये २५०० कोटींहून जास्त ठेवी होत्या. या बँकेत भ्रष्टाचार, अनियमितता व अन्य आर्थिक गुन्हे घडले असल्याचे रिझर्व्ह बँकेने केलेल्या पाहणीत आढळून आले. त्यानंतर रिझर्व्ह बँकेने दि.७.२.२००२ रोजी सहकार निबंधकांना त्या अनुषंगाने आदेश देणारे पत्र पाठविले. त्यानुसार निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांनी दि.११.२.२००२ रोजी रुपी को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केले व बँकेच्या कारभाराची चौकशी सुरु केली. दि.३१.१०.२००२ रोजी सादर झालेल्या या चौकशीच्या अहवालातही रिझर्व्ह बँकेच्या दि.७.२.२००२ च्या पत्राचा उल्लेख आहे. ज्या पत्राच्या आधारे ही सर्व कारवाई केली गेली ते जाहीर होणे बँकेचे खातेदार, ठेवीदार, सहकार क्षेत्र, बँक व्यवसाय इ.च्या दृष्टीने आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री.करमरकर यांनी लेखी व तोंडी केले.

रिझर्व्ह बँकेने दि.७.२.२००२ चे पत्र 'गोपनीय' असल्याचे नमूद करुन 'अन्यत्र हस्तांतरित करु नये' असे म्हटले आहे. ते उपलब्ध करुन दिले तर पुढील काळात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अशा प्रकारचा तपशील विश्वासाने सहकार खात्याला देणार नाही. म्हणून हे पत्र उपलब्ध करुन देणे योग्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक श्री.प्रकाश अष्टेकर यांनी केले. परंतु या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीचा अहवाल जाहीर केला गेला आहे. आपल्यालाही

त्याची प्रत मागणीनुसार देण्यात आली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने केलेल्या पाहणीचा अहवालही आपल्याला प्राप्त करुन देण्यात आला आहे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार सहकार खात्याने केलेल्या कारवाईला विविध व्यक्तींनी दिलेल्या आव्हानामध्येही या पत्राचा वापर केला गेला आहे, म्हणजेच काही व्यक्तींना हे पत्र उपलब्ध झालेले आहे. असे असताना ते गोपनीय म्हणून नाकारणे सार्वजनिक संस्थेची माहिती नागरिकांना नाकारणे ठरेल, असा युक्तिवाद श्री.करमरकर यांनी केला.

रिझर्व्ह बँकेने आर्थिक संस्थांच्या संदर्भात पाठविलेले गोपनीय पत्र जाहीर करणे हे विश्वासाने रिझर्व्ह बँकेकडून माहिती मिळण्यास मारक ठरेल, तसेच सहकारी बँकेसारख्या आर्थिक संस्था आर्थिक घसरणीतून वाचवून सभासद, खातेदार, ठेवीदार यांचे व एकूणच बँक व्यवसायाचे हितरक्षण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यास प्रतिकूल ठरेल. संबंधित संस्थेच्या आर्थिक हितसंबंधानाही हानी पोहोचण्याचा धोका त्यात सामावलेला आहे. म्हणून हे पत्र गोपनीय असेच असले पाहिजे. आवश्यक तर अर्जदाराने ते रिझर्व्ह बँकेकडे मागावे, ते द्यावे अथवा न द्यावे याबाबतचा निर्णय घेण्यास रिझर्व्ह बँक सक्षम आहे, असे प्रतिपादन श्री.अष्टेकर यांनी केले.

उभय बाजूंचे प्रतिपादन लक्षात घेता गोपनीयता हा उभय बाजूंच्या भूमिकेतील मतभेदाचा मुद्दा आहे. बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांनी केली, त्या आदेशात रिझर्व्ह बँकेच्या दि.७.२.२००२ च्या पत्रातील रुपी बँकेमधील आर्थिक गैरव्यवहाराच्या व इतर अनुषंगिक मुद्यांचा उल्लेख आहे. तसेच या पत्राच्या आधारेच संबंधित गैरव्यवहाराबाबत चौकशी व पुढील कार्यवाही केली गेली आहे. रिझर्व्ह बँकेने हे पत्र 'गोपनीय' असे म्हटले असले तरी त्यातील काही तपशील अशा प्रकारे व प्रसारमाध्यमांमधूनही प्रसिध्द झालेला आहे. या स्थितीत सदर पत्राची गोपनीयता बव्हंशी तांत्रिक दृष्टयाच राहिली आहे. तसेच या पत्राच्या आधारे केली जाणारी कार्यवाही हा केवळ बँकेच्या संचालकांपुरताच नव्हे, तर खातेदार; ठेवीदार; भागधारक; सहकारी बँकिंग क्षेत्र व एकूण समाज यांच्याशी संबंधित असा विषय आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने त्याची व्याप्ती मोठी आहे.

संबंधित चौकशी पूर्ण होईपर्यंत चौकशीकामी अडथळा येऊ नये म्हणून हे पत्र प्रसृत न करणे काही प्रमाणात मान्य होऊ शकते. परंतु चौकशी पूर्ण होऊन पुढील कारवाई देखील झाली आहे. संबंधित दाव्यांमध्येही ते पत्र दाखल करणे आवश्यक ठरेल. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे त्याची गोपनीयताही प्रत्यक्षात तांत्रिक दृष्ट्याच राहिली आहे. अशा स्थितीत; केवळ गोपनीयतेचा शिक्का आहे म्हणून नागरिकांना ते नाकारणे समर्थनीय ठरणार नाही. उलट अपुरा, अर्धवट अथवा ऐकीव असा तपशील नागरिकांपर्यंत या ना त्या मार्गाने पोहोचणे अधिक अहिताचे आहे. म्हणून वस्तुस्थिती नागरिकांपुढे नेमकेपणाने आली पाहिजे. सार्वजनिक संस्थांच्या कारभारात पारदर्शकता प्रस्थापित करणे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित आहे. गोपनीयता अपरिहार्य तेथे व तेवढीच असावी याबाबतची स्पष्ट तरतूद या अधिनियमामध्ये केलेली आहे. ही सर्व स्थिती लक्षात घेता रिझर्व बँकेचे उपरोक्त पत्र नागरिकांना / अपीलकर्त्याला उपलब्ध करुन दिले जाणे आवश्यक आहे. म्हणून आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) रिझर्व्ह बँकेच्या दि.७.२.२२०२ च्या क्र.यूबीडी.बीएसडी (१)(एससीबी)/ ३१८४/ १२.०३.९४१/२००१-०२ पत्राची प्रत अपीलकर्त्यास दि.३०.११.२००७ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध करुन द्यावी. त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

पुणे
दि. १६.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश वसंत बेंडे
रा.१६, शैलनील हौसिंग सोसायटी,
रामबाग कॉलनी, पौड रोड,
कोथरुड, पुणे ४११०३८ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड (अ.क्र.३४१)
महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८ उत्तरवादी

(२)**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता, पिंपरी चिंचवड (अ.क्र.३४३)
महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

(३)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड (अ.क्र.३४६)
महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४१+३४३+३४६/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.७.२००७ |

| | |
|---|---|
| ३ | **उपस्थित** |

**अपीलकर्ता** श्री.महेश वसंत बेंडे
रा.१६, शैलनील हौसिंग सोसायटी,
रामबाग कॉलनी, पौड रोड,
कोथरुड, पुणे ४११०३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

**(१)जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड (अ.क्र.३४१)
महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८ उत्तरवादी

**(२)जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता, पिंपरी चिंचवड (अ.क्र.३४३)
महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

**(३)जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड (अ.क्र.३४६)
महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.३.२००६ (अ.क्र.३४१)<br>दि. १६.३.२००६(अ.क्र.३४३)<br>दि. १८.३.२००६(अ.क्र.३४६) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.४.२००६(अ.क्र.३४१)<br>दि. ७.४.२००६(अ.क्र.३४३)<br>दि. २४.४.२००६ (अ.क्र.३४६) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.४.२००६<br>(अ.क्र.३४१+३४३)<br>दि.२६.४.२००६ (अ.क्र.३४६) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.५.२००६ (अ.क्र.३४१)<br>दि.१८.५.२००६ (अ.क्र.३४३)<br>दि. १९.५.२००६ (अ.क्र.३४६) |

केल्यास ही माहिती देता येईल, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त यांनी अपील नामंजूर केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध पदांवर होणाऱ्या पदोन्नत्या हा नेहमीच वादाचा विषय राहिलेला आहे. यामध्ये वांरवार अधिकाऱ्यांच्या सोयीचे बदल करण्यात येतात व आजपर्यंत करण्यात आले आहेत. सदरची माहिती व त्यामधील सत्य परिस्थिती ही जनतेसमोर यावी व कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फुटावी या हेतूने माहिती मागितली होती व सदरची माहिती देण्यात येत नसल्यामुळे या सर्व प्रकारामागे बरीच मोठमोठी रहस्ये दडण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. ही सत्य परिस्थिती जनतेस समजावी या हेतूसाठी हे अपील दाखल करीत आहे, असे श्री.बेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलात म्हटले आहे.

श्री.बेंडे यांनी मागितलेली माहिती दि.१.१.१९८२ ते दि.१८.३.२००६ या कालावधीतील आहे. श्री.बेंडे गेली काही वर्षे महानगरपालिकेच्या सेवेत असून कनिष्ठ अभियंता (यांत्रिक) म्हणून पदोन्नती मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत. त्या अनुषंगाने माहितीच्या अधिकाराखाली व अन्य स्वरुपाचे विविध अर्ज ते महानगरपालिकेकडे करीत आले आहेत. मूळ अर्जासोबत त्यांनी पदोन्नतीबाबतची यादी सादर केली नव्हती, सर्वसाधारण व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. नंतर त्यांनी देऊ केलेली यादी २३२ पदांची आहे. आपल्या स्वतःच्या पदोन्नतीशी संबंधित असा हा विषय असल्याचे श्री.बेंडे यांनी मान्य केले. पदोन्नतीत काही कर्मचाऱ्यांना वेगळे न्याय व काहींबाबत वेगळे निकष असे होते. श्री.अमृत सावंत हे लिपिक म्हणून महानगरपालिकेत होते. सेवेत ते कायम झाले नसताना त्यांना पदोन्नती देण्यात आली व अशी पदोन्नती मिळत मिळत ते सहाय्यक आयुक्त पदापर्यंत पोहोचले, असे श्री.बेंडे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. चोवीस वर्षांमधील एवढी व्यापक माहिती देण्यातील अडचणी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त श्री.सुधीर जोशी यांनी स्पष्ट केल्या. आयोगाने त्यांचे म्हणणे मान्य करुन, एवढी विस्तृत माहिती पुरविण्याचा आदेश दिला जाणार नाही, असा निर्णय दिला, असता श्री.बेंडे यांनी सहाय्यक आयुक्त प्रशासन या एकाच पदाची माहिती आपल्याला हवी असल्याचे सांगितले. ही माहिती एका

आठवड्याच्या आत देण्याचा आदेश आयोगाने त्याच वेळी दिला. त्याची पूर्तता करण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका यांनी दि.१८.७.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.

**अपील क्र.३४३**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्र, मैला शुध्दीकरण केंद्र, पाणीपुरवठा विभाग इ. ठिकाणी पंपांची खरेदी करताना त्यांची निवड कशा प्रकारे केली जाते, कोणत्या अधिकाऱ्याचा सल्ला त्याबाबत ग्राह्य मानण्यात येतो, अशा अधिकाऱ्याची नांव, हुद्दा, शैक्षणिक, तांत्रिक पात्रता व या पात्रतेचा तपशील अशी माहिती श्री.बेंडे यांनी मागितली होती. माहिती चुकीची व अपूर्ण असल्याच्या कारणावरुन श्री.बेंडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे अपील केले. त्यांनी ते अंशतः मंजूर केले. तीनपैकी एका मुद्याबाबत झालेली स्पेलिंगची चूक दुरुस्त करुन द्यावी व अन्य दोन मुद्यांबाबत (संदिग्धता असल्यामुळे) ठराविक कालावधी नमूद करुन स्वतंत्र अर्जाव्दारे माहितीची मागणी करावी, असा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. योग्य माहिती मिळाली नसल्याचे व चुकीच्या पध्दतीने पंपांची निवड होत असल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते, पर्यायाने जनतेचा पैसा वाया जातो, ते जनतेला कळावे म्हणून आपण अपील केले असल्याचे श्री.बेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे.

श्री.बेंडे यांनी पंप निवडीसाठीचा निकष विचारला होता, त्यात आयएस संहितेनुसार निवड केली जाते असे म्हटले आहे ते चुकीचे आहे, असे श्री.बेंडे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले, मात्र पंपासाठी आयएस (Indian Standard) संहिता आहे हे नमूद करुन जन माहिती

अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी त्याच्या प्रती आयोगाला सादर केल्या. त्यात प्रत्येक प्रकारच्या पंपासाठी स्वतंत्र प्रमाणक दिलेले आहे. असे असल्यास महानगरपालिकेने खरेदी केलेल्या पंपावर त्याची नोंद हवी, ती दिसत नाही, असा मुद्दा श्री.बेंडे यांनी उपस्थित केला. परंतु हा विषय माहितीच्या अधिकारापेक्षा स्वतंत्र असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता यांनी स्पष्ट केले.

पंपांची निवड, खरेदी व दुरुस्ती या संदर्भात कोणत्या अधिकाऱ्याचा सल्ला ग्राह्य धरण्यात येतो याची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे, मात्र अशा अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा, शैक्षणिक व तांत्रिक पात्रता व ती त्या अधिकाऱ्याने कोठून प्राप्त केली, ही विचारणा संदिग्ध स्वरुपाची आहे. त्यामुळे ठराविक कालावधी नमूद केल्यास संबंधित अधिकाऱ्याची माहिती देता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी नमूद केले आहे. माहितीच्या मागणीतील संदिग्धता लक्षात घेतल्यास हे उत्तर रास्त आहे.

आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील अमान्य.

## अपील क्र.३४६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विकास अभियंता (विद्युत यांत्रिकी) यांच्या अधिपत्याखाली कनिष्ठ अभियंता (विद्युत यांत्रिकी) या पदावर कोणत्या कर्मचाऱ्याची व कोणत्या कालावधीपासून नियुक्ती करण्यात आली आहे, याबाबत शासनाचे संबंधित नियम, पालिकेचे संबंधित ठराव, आवश्यक अर्हता इ. तपशिलासह माहिती श्री.बेंडे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी श्री.सुधीर जोशी यांनी दिलेली माहिती कनिष्ठ अभियंता (विद्युत) पदाची दिली. कनिष्ठ अभियंता (विद्युत / यांत्रिकी) असे पद होते, त्याची माहिती दिली नाही, म्हणून श्री.बेंडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, पुणे यांच्याकडे

अपील केले. याच विषयाबाबत श्री.बेंडे यांनी यापूर्वी केलेल्या अपिलाबाबत निर्णय दिला असल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचे अपील निकाली काढले. त्याविरुध्द, चुकीची माहिती दिल्याचे कारण नमूद करुन श्री.बेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.बेंडे यांचा स्वतःची पदोन्नती हा मुख्य विषय असल्यामुळे सातत्याने माहितीच्या अधिकारात विविध प्रकारचे अर्ज ते करीत आहेत. त्याचाच हा एक भाग आहे. आपल्यावरील प्रशासकीय अन्याय दूर करुन घेण्यासाठी माहितीच्या अधिकाराचा अवलंब करणे आपल्याला भाग पडत आहे, असे श्री.बेंडे यांनी नमूद केले.

वर नमूद केलेल्या अपील क्र.३४१ प्रमाणेच हे अपीलही श्री.बेंडे यांच्या पदोन्नतीशी संबंधित आहे. कनिष्ठ अभियंता हे पद विद्युत व यांत्रिकी या दोन्हीबाबत समान अर्हतेचे असल्यामुळे वेगळी माहिती दिली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

श्री.बेंडे यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली, मात्र विद्युत/यांत्रिकी यातील पदांसाठीचा तांत्रिक तपशील दिला गेलेला नाही, एवढाच मुख्य आक्षेप आहे. हा तपशील त्वरित द्यावा असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याच्या पूर्ततेचा अहवाल आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका श्री.दिलीप बंड यांनी दि.१३.७.२००७ रोजी आयोगाला सादर केला आहे.

## आदेश

अपील अमान्य.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

पुणे
दि.२३.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश वसंत बेंडे
रा.१६, शैलनील हौसिंग सोसायटी,
रामबाग कॉलनी, पौड रोड,
कोथरुड, पुणे ४११०३ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ,
महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादित, — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पुणे परिमंडळ,
महावितरण, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.७.२००७ |

**३ उपस्थित**

अपीलकर्ता श्री.महेश वसंत बेंडे
रा.१६, शैलनील हौसिंग सोसायटी,
रामबाग कॉलनी, पौड रोड,
कोथरुड, पुणे ४११०३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
श्री.र.ब्रि.गौतम

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पुणे परिमंडळ, महावितरण, पुणे श्रीमती मनिषा जयंत प्रयाग

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

उच्च दाब वीज ग्राहकांसाठी २२ केव्ही वाहिनीव्दारे विद्युत पुरवठा केला जातो, सदरचा आयसोलेटर स्वीच हा ग्राहकाच्या की वीज वितरण कंपनीच्या अखत्यारीत येतो. यातील एखादी वाहिनी बंद पडल्यास वीज पुरवठा पूर्ववत करण्याचे काम कोणाचे, जर सदर काम ग्राहकानेच करावयाचे तर ते वीज वितरण कंपनीच्या कोणत्या नियमास अनुसरुन, तसेच हे काम करताना कोणी व्यक्ती दगावल्यास वीज कंपनी त्याची जबाबदारी घेणार काय.

## विवेचन

उच्चदाब वीज ग्राहकांसाठी २२ केव्ही वाहिनीव्दारे होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.महेश वसंत बेंडे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे मागितली होती. मूळ अर्जात विचारलेली माहिती न देता वेगळी व अनावश्यक माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली, या कारणावरुन श्री.बेंडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता यांच्याकडे अपील केले. त्याची दखल न घेतल्यामुळे श्री.बेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.बेंडे हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्रामध्ये इलेक्ट्रीक मोटार व पंप ऑपरेटर आहेत. या केंद्रासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीव्दारे २२केव्हीच्या दोन वाहिन्यांव्दारे वीजपुरवठा केला जातो. या वाहिनीसाठी दिलेला आयसोलेटर स्वीच कोणाच्या अखत्यारीत येतो(ग्राहकाच्या की वीज केंद्राच्या), एखादी वाहिनी बंद झाल्यास दुसऱ्या वाहिनीव्दारे

वीजपुरवठा करण्याचे काम यातील कोणाच्या अखत्यारीत येते , आयसोलेटर स्वीच वापराचे काम ग्राहकानेच करावयाचे असल्यास या कामात कोणी दगावल्यास जबाबदारी वीज वितरण कंपनी घेणार काय?, अशी माहिती त्यांनी मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.के.व्ही.अजनाळकर यांनी 'उच्च दाब ग्राहकांसाठी २२ केव्ही वाहिनीव्दारे विद्युत पुरवठा केला जातो. अशा वेळी ग्राहकाच्या मीटर अगोदर नवीन नियमाप्रमाणे कसलाही आयसोलेटर स्वीच दिला जात नाही. यापूर्वीचे अस्तित्वात असलेले आयसोलेटर स्वीच काढून टाकण्याचे आदेश कंपनीने पूर्वीच दिलेले आहेत', असे विचारलेल्या माहितीशी असंबध्द उत्तर दिले. हे उत्तर योग्य नव्हते, हे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ महावितरण, पुणे श्री.र.ब्रि.गौतम यांनी आयोगापुढील सुनावणीत मान्य केले, मात्र श्री.बेंडे यांनी दि.४.५.२००६ रोजी केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी दि.१३.४.२००६ रोजी ठेवण्यात आली होती, परंतु श्री.बेंडे या सुनावणीला हजर राहिले नाहीत अथवा त्यांनी याबाबत कोणत्याही प्रकारे संपर्क साधला नाही असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पुणे परिमंडळ महावितरण, पुणे श्रीमती मनिषा जयंत प्रयाग यांनी लेखी व तोंडी नमूद केले. मात्र आपल्याला या सुनावणीचे पत्र मिळाले नाही असे श्री.बेंडे यांनी सांगितले. सुनावणीबाबत आपण नंतर चौकशी करावयास हवी होती, ती न करण्याची चूक, झाली असे श्री.गौतम यांनी मान्य केले. आयोगापुढील सुनावणीच्या दरम्यान दि.१०.७.२००७ रोजी श्री.बेंडे यांना योग्य ती माहिती घरपोच पुरविण्यात आली, असे श्री.गौतम यांनी सांगितले, अशी माहिती आपल्याला मिळाल्याचे श्री.बेंडे यांनी मान्य केले.

२२ केव्ही वाहिनी बदलाचे काम वीज वितरण कंपनीच्या अखत्यारीत येते. परंतु या कंपनीचे कर्मचारी हे काम करण्यास नकार देतात व पालिकेचे अधिकारी पालिकेच्या कर्मचाऱ्यांना हे काम करणे भाग पाडतात, एवढेच नव्हे, तर पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना जबाबदार धरुन कारवाई करण्याची इशाराही दिला जातो, असे श्री.बेंडे यांनी अशा कारवाईच्या पत्रासह नमूद केले. या कामात अपघात घडल्यास वा एखादा कर्मचारी दगावल्यास त्याची जबाबदारी कोणाची हे स्पष्ट होणे संबंधित कर्मचाऱ्यांच्या जिविताला असणारा धोका लक्षात

घेता आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री.बेंडे यांनी केले. एका वाहिनीवरील वीजपुरवठा खंडित झाल्यास दुसऱ्या वाहिनीवरुन वीजपुरवठा सुरु करण्याबाबत वीज वितरण कंपनीच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयास कळविल्यास तेथील कर्मचारी फिडरचे काम करतील, असे जन माहिती अधिकारी श्रीमती प्रयाग यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

अपीलकर्त्याने मांडलेला प्रश्न गंभीर असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांशी संपर्क साधून फिडर आदी जबाबदारी वीज मंडळाची असल्याचे व ती पार पाडली जाईल याची हमी आपण स्वत: घेत असल्याचे कळवू, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाने केलेल्या सुविधा संबंधित यंत्रणांमध्ये समाविष्ट करुन ग्राहकांच्या गरजेबाबतही आपण सुधारणा करु, असे स्पष्टीकरणात्मक निवेदन श्री.गौतम यांनी वरील माहितीच्या अनुषंगाने केले. मूळ अर्जात अपेक्षित असलेल्या माहितीच्या संदर्भात हे स्पष्टीकरण महत्त्वाचे आहे. आयोग त्याची आवर्जून नोंद घेत आहे.

आपल्याला माहिती मिळाली असली तरी संबंधितांना शास्ती केली जावी, अशी मागणी श्री.बेंडे यांनी केली. श्री.बेंडे यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबत पत्र पाठविल्यानंतर ते हजर नव्हते तसेच केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ ची कार्यवाही सुरु होऊन काही महिनेच झाले असल्यामुळे या संदर्भातील फारशी माहिती व अनुभव नव्हता. याच काळात अधिकारी व संलग्न कर्मचारी यांच्या बदल्याही झाल्या त्यामुळेही हा विषय मागे पडला. माहिती दडवण्याचा किंवा माहिती न देण्याचा हेतू नसून झालेली ही चूक आहे. त्याची दखल घेऊन दि.४.१०.२००६ पासून अपिलाची स्वतंत्र नोंद ठेवून ती विहित मुदतीत निकाली काढण्यात येत आहेत, त्यामुळे प्रथमची झालेली चूक व नंतर अनुसरलेली कार्यपध्दती विचारात घेऊन दंडात्मक कारवाई करु नये, अशी विनंती मुख्य अभियंता श्री.गौतम यांनी निवेदनाव्दारे आयोगाला केली. याबाबतचा पूरक तपशीलही त्यांनी आयोगाला सादर केला, त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ, महावितरण, पुणे श्री.र.ब्रि.गौतम यांनी शास्तीबाबत दिलेले स्पष्टीकरण स्वीकारण्यात येत असून शास्ती नाही. मात्र (अ)श्री.के.व्ही.अंजनाळकर, कार्यकारी अभियंता, प्रशासन (ब)श्री.अे.एम.थोरात, कार्यकारी अभियंता,प्रशासन (क)श्री.अे.ई.नेरकर, उपमुख्य माहिती व जनसंपर्क अधिकारी (ड)श्रीमती एम.जे.प्रयाग, कार्यकारी अभियंता, प्रशासन या तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांना समज देण्यात येत आहे.

(३) अपिलाची दखल विहित मुदतीत घेण्याची समज अपिलीय प्राधिकाऱ्यांना देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

पुणे
दि. १९.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळकृष्ण रामचंद्र संकपाळ
रा.घर क्र.१४७, नागेश्वर गृहरचना संस्था,
सहकारनगर, पुणे ४११००९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
वडगाव मावळ, जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
वडगाव मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.८.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळकृष्ण रामचंद्र संकपाळ
रा.घर क्र.१४७, नागेश्वर गृहरचना संस्था,
सहकारनगर, पुणे ४११००९

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
वडगाव मावळ, जि.पुणे डॉ.संपत खिलारी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
वडगाव मावळ, जि.पुणे श्री.कि.व.घाडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>जिल्हाधिकारी, पुणे यांचे स्पष्ट आदेश असूनदेखील इनामदार वसंत नारायण घमंडे यांच्या नावाची नोंद वारस नोंदी उताऱ्यास भूमापन अधिकारी यांनी घेतली. ती नियमबाह्य असल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांचे स्पष्ट दुरुस्ती आदेश ज्या अन्वये ही नोंद घेतली त्याची प्रत मिळावी. नोंद विनाविलंब कमी करण्याच्या विनंती अर्जावर कार्यवाही व्हावी. | |

## विवेचन

इनामी जमीन खालसा झालेल्या भूखंडावरील इनामदार वसंत नाराण घमंडे यांचे नावाची नोंद कमी करण्याचे आदेश संबंधित भू-मापन अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी मागणी अपीलकर्ता श्री.बा.रा.संकपाळ यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी हा अर्ज तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांच्या कार्यालयाकडे अर्ज करावा, असे कळवून निकाली काढला. त्याविरुध्द श्री.संकपाळ यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अपील केले. तहसीलदार, मावळ हे अपिलीय प्राधिकारी असल्यामुळे जिल्हाधिकारी, पुणे यांनी तो अर्ज तहसीलदार, मावळ यांच्याकडे पाठविला व तसे श्री.संकपाळ यांना कळविले. तहसीलदार, मावळ यांनी अपिलाची सुनावणी करुन निर्णय न दिल्यामुळे श्री.संकपाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

इनाम जमीन नावावर करण्याच्या संदर्भातील हा प्रश्न असून श्री.संकपाळ यांनी माहितीची मागणी व कार्यवाहीबाबतची मागणी यात गल्लत केली आहे. आपल्या मागणीवर कोणती कार्यवाही केली गेली ही माहिती आपल्याला मिळावी, असे श्री.संकपाळ यांनी आयोगापुढील सुनावणीत स्पष्ट केले. श्री.संकपाळ हे ज्येष्ठ नागरिक असून त्यांना नव्याने अर्ज करावा लागू नये. हव्या असलेल्या

माहितीबाबतचा फेरअर्ज त्यांच्याकडून घेऊन त्यांना दोन दिवसात माहिती देण्याचे तहसीलदार, मावळ डॉ.संपत खिलारी यांनी मान्य केले. परंतु सुनावणीला १५ दिवस उलटून गेले असूनही आपल्याला माहिती दिलेली नाही, असे श्री.संकपाळ यांनी आयोगाला पाठविलेल्या निवेदनात (प्राप्त दि.२१.८.२००७) नमूद केले.

सदरच्या जमिनीवर इनामी खालसा अशी नोंद झाल्यानंतर त्यावर कोणाचा मालकी हक्क प्रस्थापित होतो याची माहिती जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दि.१.१.१९६१ च्या आदेशाच्या अनुषंगाने श्री.संकपाळ यांना हवी आहे.

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मावळ डॉ.संपत खिलारी यांनी प्रत्यक्ष सुनावणीत मान्य केल्याप्रमाणे सुनावणीच्या तारखेपासून दोन दिवसात माहिती देणे आवश्यक होते. त्याची पूर्तता त्यांनी केली नसल्यास आयोगाला गंभीर दखल घ्यावी लागेल, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्याकडून फेरअर्ज घेऊन दोन दिवसात माहिती देण्याबाबतच्या कार्यवाहीच्या पूर्ततेचा अहवाल विलंबाच्या स्पष्टीकरणासह डॉ.संपत खिलारी यांनी दि.१०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. २६.११.२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

# राज्य माहिती आयोग, पुणे विभाग, पुणे

क्र.रामाआ/अपील/सांगली/३७९/२००७
राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
फोन क्र. २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दिनांक : २४/१२/२००७.

प्रति,

श्री आनंद रामचंद्र दिपाळे ,
शिवदर्शन कॉलनी, एम.एस.ई.बी.शेजारी,
विश्रामबाग, सांगली.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बाबत.

संदर्भ : आपले दि.२७/३/२००६ चे व्दितीय अपिल

महोदय,

वरील संदर्भाधीन अपिलाबाबत आपणास कळविण्यात येत आहे की, आपल्या व्दितीय अपिलपतील विषय आयोगाकडे दाखल झालेल्या यापूर्वीच्या अपिल क्र २३९/सांगली यातील विषय एकच आहे. सबब अपिल क्र २३९/सांगली मध्ये झालेल्या निर्णयाची प्रत आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

सदर अपीलामध्ये श्री. राजेंद्र साबळे यांचे अपील २३९/सांगली मध्ये घेतलेला निर्णय आपल्या प्रकरणात कायम ठेवण्यात येत असल्याचे कळविण्याचे मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या निर्देश आहेत सबब आपले अपिल अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.

आपला,

कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
पुणे विभाग, पुणे

दिनांक

प्रत :

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे महानगर परिवहन उपक्रम कॅन्टीन इमारत स्वारगेट , पुणे ३७.
२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी , प्रशासकीय इमारत जिल्हा परिषद कंपाउंड , सांगली , जिल्हा सांगली.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र नामदेव साबळे
रा.वर्षा निवास, साठेनगर,
आटपाडी, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (शिक्षण)
समाजकल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, ३,चर्चरोड, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (प्रशासन) समाजकल्याण
संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.७.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र नामदेव साबळे
रा.वर्षा निवास, साठेनगर,
आटपाडी, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (शिक्षण)
समाजकल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, ३,चर्चरोड, पुणे-१
श्री.एल.एस.माळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>समाजकल्याण विभाग मुख्यालयाकडून शासकीय वसतीगृहातील स्वयंपाकी व मदतनीस या कर्मचाऱ्यांना आठवड्याच्या व सार्वजनिक सुट्ट्या अनुज्ञेय आहेत व त्यांना सुट्ट्या देताना पर्यायी व्यवस्था संबंधितांनी करण्याची असते. सदर स्वयंपाकी व मदतनीस कर्मचाऱ्यांना शासकीय वसतीगृहाच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांसह इतर सर्व कर्मचाऱ्यांना या सुट्ट्यांचा लाभ का दिला जात नाही याची माहिती शासन नियम, निर्णय अथवा परिपत्रकाच्या प्रतींसह. | |

## विवेचन

समाजकल्याण विभागातील वसतीगृहातील स्वयंपाकी व मदतनीस या कर्मचाऱ्यांना शासकीय वसतीगृहातील स्तरावरील कर्मचाऱ्यांसह इतर सर्व कर्मचाऱ्यांना आठवड्याच्या व सार्वजनिक सुट्ट्यांचा लाभ का दिला जात नाही याबाबतची माहिती आधारभूत शासन नियम, निर्णय अथवा परिपत्रक यांच्या प्रतींसह मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.राजेंद्र नामदेव साबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (प्रशासन) समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मागितली होती. त्यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे श्री.साबळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (शिक्षण) समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय कायम केला. परंतु आपल्याला मिळालेली माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्याच्या व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेला आदेश समाधानकारक नसल्याच्या कारणावरुन श्री.साबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.साबळे यांच्या मूळ अर्जाला जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. 'स्वयंपाकी व मदतनीस या कर्मचाऱ्यांना आठवडयाच्या व सार्वजनिक सुट्ट्या अनुज्ञेय आहेत. परंतु

स्वयंपाकी व मदतनीस ही शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजन व्यवस्थेसाठी आवश्यक पदे आहेत. सदरच्या सुट्ट्या उपभोगण्यास स्वयंपाकी व मदतनीस यांनी परस्पर ठरवून वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांची गैरसोय न होता गृहपाल यांच्या सहमतीने साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी देता येते. सदरच्या सुट्ट्याबाबत त्यांना नियुक्तीच्या वेळी कल्पना दिली जाते, याबाबत शासन निर्णय अथवा परिपत्रक निर्गमित झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या प्रती देणे शक्य नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक यांनी श्री.साबळे यांना कळविले. परंतु ही माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करुन श्री.साबळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (शिक्षण) यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी शासनाशी संपर्क साधून याबाबत परिपत्रक, नियम, निर्णय असलयास त्याबाबतची विचारणा केली, परंतु शासन निर्णय अथवा परिपत्रक निर्गमित न झाल्याचे स्पष्ट झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करुन अपिलीय प्राधिकारी यांनी तसे श्री.साबळे यांना कळविले.

शासकीय वसतीगृहातील इतर सर्व कर्मचाऱ्यांना आठवड्याच्या व सार्वजनिक सुट्ट्यांचा लाभ दिला जातो. स्वयंपाकी व मदतनीस या कर्मचाऱ्यांना असा लाभ दिला जात नाही. हा भेदभाव कशाच्या आधारावर केला जातो हे स्पष्ट व्हावे व तो दूर व्हावा म्हणून आपण ही माहिती मागितली असल्याचे श्री.साबळे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. या कर्मचाऱ्यांना संबंधित सुट्ट्या मिळाल्या पाहिजेत. त्या संदर्भात शासनाचा कोणताही निर्णय कसा नाही? मग ज्यांना अशा सुट्ट्यांचा लाभ दिला जातो त्यांच्या बाबतीत तशा स्वरुपाचे आदेश उपलब्ध आहेत काय, अशी विचारणा श्री.साबळे यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी केली. परंतु आपण दिलेली माहिती योग्य असून इतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील माहिती हा आपल्यापुढील विषय नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक श्री.एल.एस.माळी यांनी स्पष्ट केले. विभागीय स्तरावरील शासकीय वसतिगृहांमध्ये ठेकेदारी पध्दतीने भोजन अथवा विशिष्ट रक्कम देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे श्री.माळी यांनी सांगितले. 'शासनाने शासन परिपत्रक क्र.बीसीएच-२००२/प्र क्र ३०१/मावक-४, दि.१७.६.२००३ नुसार जी २८ नवीन वसतीगृहे सुरु केलेली आहेत, तेथील विद्यार्थ्यांना ठेकेदारी पध्दतीने मेस सिस्टीमवर जेवण देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तेथे स्वयंपाकी अथवा मदतनीस यांची पदेही निर्माण केलेली नाहीत. त्याचप्रमाणे शासन निर्णय क्र.बीसीएच-

२००५/प्र क्र ५५४/मावक-४, दि.२८.६.२००७ नुसार शासनाने मागासवर्गीय मुला-मुलींसाठी तालुक्यांच्या ठिकाणी नवीन १०० वसतीगृहे, तसेच विभागीय स्तरावर १००० क्षमतेची जी वसतीगृहे सुरु करण्याचा निर्णय घेतलेला असून त्यामध्येही या वसतीगृहांसाठी मेस सिस्टीम चालू राहील हे स्पष्ट केलेले आहे. याही शासन निर्णयात स्वयंपाकी अथवा मदतनीस यांची पदे निर्माण केलेली नाहीत. थोडक्यात शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना जेवण हे मेस पध्दतीनेच देण्याचे शासनाने निश्चित केलेले आहे. त्यामुळेच आता स्वयंपाकी व मदतनीस यांची पदे निर्माण करण्यात आलेली नाहीत. जे स्वयंपाकी व मदतनीस सध्या शासकीय वसतीगृहांमध्ये कार्यरत आहेत त्यांना अन्य संवर्गामध्ये समाविष्ट करुन घेण्याचे प्रस्तावित आहे. या संदर्भात सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी आणि विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना संचालनालय स्तरावरुन पत्र क्र.१२१३, दि.२४.४.२००७ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत', असे श्री.माळी यांनी नमूद केले. हे स्पष्टीकरण धोरणात्मक निवेदन करणारे आहे. स्वयंपाकी व मदतनीस यांना साप्ताहिक व अन्य सार्वजनिक सुट्ट्या द्याव्यात, ही श्री.साबळे यांची मूळ मागणी केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २२.११.२००७**